# प्रकरण पाचवे

# सावरकरांचा हिंदी राष्ट्रवाद

## प्रकरण पाचवे

# सावरकरांचा हिंदी राष्ट्रवाद

### भारतीय राष्ट्रवादाचा विकास १८८५ ते १९१० :

इंग्रजी राजवटीतील अन्यायाचे परीमार्जन करण्यासाठी व देशाच्या शांततेच्या सनदशीर मार्गाने सर्वांगिण विकास घडवून आणण्यासाठी दादाभाई नौरोजी, फिरोजशाहा मेहता, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, न्या. रानडे यांनी २८ डिसेंबर, १८८५ रोजी मुंबई येथे राष्ट्रव्यापी राष्ट्रीय कॉंग्रेस या संघटनेची स्थापना केली. देशाच्या प्रगतीला हातभार लावण्याची तळमळ असलेल्या देशाच्या सर्व भागातील लोकांना एकत्रित आणणे, धर्म, वंश, जात व प्रादेशिक भेदांच्या कृत्रिम मर्यादा नष्ट करून एकराष्ट्रीयत्वाची भावना वृध्दिंगत करणे, भारतीय जनतेपुढे असणाऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांचा उहापोह करण्यासाठी एक राष्ट्रीय व्यासपीठ निर्माण करणे आणि राष्ट्रहिताच्या दृष्टीने कोणते कार्य करणे श्रेयस्कर ठरेल याविषयी निर्णय घेणे इत्यादी उद्दिष्टये राष्ट्रीय कॉंग्रेसची निश्चित करण्यात आली. परंतु या उद्दिष्टांची अंमलबजावणी करण्याच्या मतभेदातून कॉंग्रेसमध्ये पुढील दोन विचारप्रवाह उदयास आले. १) उदारमतवादी विचार प्रवाह आणि २) जहाल विचार प्रवाह.

### १) उदारमतवादी विचार प्रवाह :

उदारमतवादी वा नेमस्त विचारप्रवाहाचे समर्थक न्या. रानडे, फिरोजशाहा मेहता, ना. गोखले, सुरेंद्रनाथ बॅनर्जी इत्यादी नेते होते. त्यांच्यावर पाश्चात्य उदारमतवादी विचारांचा प्रभाव पडल्याने त्यांनी भारतीय राज-

कारणात उदारमतवादी विचारांचा स्वीकार केला. या विचारप्रवाहाचे असे मत होते की, भारतातील इंग्रजांच्या अन्यायी राजवटीचे परिमार्जन शांततेच्या सनदशीर मार्गाने करून देशाची प्रगती घडवून आणली पाहिजे. त्यांना भारतीय राजकारणात क्रांतिकारक व जहाल मार्ग पसंत नव्हता. भारताच्या प्रगतीसाठी इंग्रज राजसत्तेला उघड विरोध करून चालणार नाही, तर त्यासाठी शांतता व सुव्यवस्था टिकवून सनदशीर मार्गांचा स्वीकार केला पाहिजे. अशी त्यांची धारणा होती. भारतीय राष्ट्र निर्मितीचे कार्य करण्यासाठी त्यांनी देशातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय सुधारणांवर भर दिला. भारतीयांना स्वत:चा राज्यकारभार स्वत: चालविता येण्यासाठी त्यांना स्वातंत्र्यापूर्वी सुशिक्षित व शहाणे बनविले पाहिजे आणि याच कारणासाठी उदारमतवाद्यांनी भारतात इंग्रज सत्तेची आवश्यकता मान्य केली. त्यांचा इंग्रजांच्या न्याय तत्वावर विश्वास होता. इंग्रज राज्य म्हणजे भारताच्या कल्याणासाठी परमेश्वराने दिलेले वरदान होय. त्यांनीच भारतात प्रथम कायद्याचे राज्य स्थापून देशात शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. त्यामुळे इंग्रजांची सत्ता भारतात राहाणे ह्यातच देशाचे कल्याण आहे. इंग्रज लोक न्यायी असल्यामुळे ते भारताचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय विकास घडवून आणतील. परंतु त्यासाठी भारतीयांनी शांततेचा सनदशीर मार्ग स्वीकारून इंग्रजांना देशाच्या कल्याणासाठी सहकार्य केले पाहिजे. त्यांनी देशाच्या राजकीय स्वातंत्र्यापेक्षा त्यांना सामाजिक सुधारणा अधिक महत्त्वाच्या वाटल्या. म्हणूनच त्यांनी अगोदरच सामाजिक सुधारणा व नंतर राजकीय स्वातंत्र्य या विचारांचा पुरस्कार केला. देशाचे राजकीय स्वातंत्र्य टिकविण्यासाठी भारतीयांनाप्रथम सुशिक्षित व शहाणे बनवून स्वातंत्र्यासाठी पात्र बनविले पाहिले. यासाठी अगोदर देशात सामाजिक सुधारणा घडवून आणल्या

पाहिजेत आणि ह्या सुधारणा इंग्रज राजवटीतच घडून येतील अशी त्यांची विचार धारणा होती. [१]

## २) जहालमतवादी विचार प्रवाह :

राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये उदारमतवादी विचार प्रवाहाच्या अगदी विरूद्ध विचारसरणी असणारा दुसरा विचारप्रवाह म्हणजे जहालमतवादी विचार प्रवाह होय. जमालमतवादी विचार प्रवाहाचे समर्थक लो. टिळक, बिपिनचंद्र पाल, लाला लजपत रॉय, अरविंद घोष इत्यादी नेते होते. जहालमतवादी विचारप्रवाह हा स्वदेशनिष्ठ होता. म्हणूनच त्यांनी अगोदर राजकीय स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. त्यांच्या मते, देशाचे राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सामाजिक सुधारणा घडवून आणता येतील. अशी त्यांची धारणा होती. जहालमतवाद्यांच्या मते, "भारतातील इंग्रजी राज्याची स्थापना ही देवाची करणी नसून ती सैतानाची आहे." त्यामुळे "इंग्रजांचे राज्य भारताला वरदान नसून तो एक भीषण शाप आहे." कारण इंग्रजांच्या अन्यायी, स्वार्थी व कपटी धोरणामुळेच भारताची अवनती झाली आहे. त्यांचा इंग्रजांच्या न्याय तत्वावर विश्वास नव्हता. त्यांनी स्वार्थासाठी भारतात अनेक भेद निर्माण करून देशाचे ऐक्य नष्ट केले आहे. इंग्रज लोक स्वार्थी व दुष्ट असल्याने ते भारतात सुधारणा घडवून आणणार नाहीत. उलट सामाजिक सुधारणांच्या नावाखाली अनेक कायदे करून भारतावर गुलाम-गिरीचे मगरमिठी आवळीत आहेत, अशा गुलामगिरीस देशाचा विकास घडून येणार नाही. म्हणून देशाच्या सर्वांगिण विकासासाठी अगोदर राजकीय स्वातंत्र्य मिळविले पाहिजे. यासाठी भारतीयांनी संघटीत होऊन स्वातंत्र्य आंदोलन उभारले पाहिजे. परंतु हे आंदोलन नि:शस्त्र प्रतिकाराच्या

मार्गाने सुरु ठेवले पाहिजे. त्यांचा राजकीय स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीच्या मार्गाला विरोध होतो. आपला देश असंघटीत व नि:शस्त्र असता सामर्थ्यशाली इंग्रज सत्तेला सशस्त्र विरोध करणे हा मार्ग आत्मघाताचा वाटत होता. म्हणून त्यांनी देशाच्या राजकीय स्वातंत्र्यासाठी नि:शस्त्र प्रतिकाराचा सनदशीर मार्ग स्वीकारला.

## सावरकर आणि जहालवाद :

स्वा. सावरकर आणि जहालवाद यांत राजकीय स्वातंत्र्य, पारतंत्र्याचा तिरस्कार, देशाचे राजकीय ऐक्य, इंग्रजांची अन्यायी सत्ता इत्यादीबाबत एकमत असलेले दिसते. दोघांचाही इंग्रजांच्या न्याय तत्वावर विश्वास नव्हता. त्यांच्या मते भारतातील इंग्रजी राज्याची स्थापना ही परमेश्वराची देणगी नसून ती सैतानाची आहे. इंग्रजी राज्य भारताला वरदान असून तो एक शाप आहे. इंग्रजांच्या स्वार्थी व कपटी नीतिमुळेच देशाची अवनती झाली आहे. त्यामुळे त्यांना पारतंत्र्याचा तिरस्कार वाटत होता. म्हणूनच त्यांना भारतातील इंग्रजांची सत्ता नष्ट व्हावी आणि देश स्वतंत्र होऊन एकात्म बनावा असे वाटत होते. देशाच्या सर्वांगिण विकासासाठी राजकीय स्वातंत्र्य मिळविणे हे त्यांचे एकच ध्येय होते. परंतु या ध्येयाच्या साधनाबाबत त्यांचेत एकमत नव्हते. मवाळवाद्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी नि:शस्त्र प्रतिकाराचा मार्ग स्वीकारला. त्यांनी स्वातंत्र्यासाठी सशस्त्र प्रतिकाराचा मार्गाला विरोध केला. कारण भारतीय लोक असंघटीत व नि:शस्त्र असता सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारणे हे त्यांना आत्मघाताचे वाटत असे. परंतु सावरकरांनी जहालवादाचे पुढचे पाऊल म्हणून राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीच्या मार्गाचा उघड उघड स्वीकार केला. "रणावीण स्वातंत्र्य कोणा

मिळाले १ अशी त्यांची विचार भूमिका होती. सशस्त्र क्रांतीशिवाय भारताला स्वातंत्र्य कधीही मिळणार नाही असे त्यांचे ठाम मत बनले. [२]

त्यांच्या मते इटली देशातील लोक असंघटीत व निशस्त्र असता तेथे मॅझिनीच्या राष्ट्रवादी विचारांनी प्रभावीत होऊन त्यांनी ऑस्ट्रियाविरूद्ध सशस्त्र क्रांती केली आणि इटलीला स्वतंत्र केले. म्हणून भारतीय स्वातंत्र्यासाठी सावरकरांनी "अभिनव भारत" या क्रांतीकारक संस्थेची स्थापना करून सशस्त्र क्रांतीच्या विचारांचा भारतात प्रचार व प्रसार केला.

## मॅझिनीचा राष्ट्रवाद आणि सावरकर :

सावरकरांनी राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी सुरूवातीपासूनच सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारला होता. अशाच परिस्थितीत त्यांना मॅझिनीच्या राष्ट्रवादाने अधिकच प्रभावीत केले. त्यांच्या मते, मॅझिनीने मांडलेला राष्ट्रवाद हा केवळ इटलीपुरताच मर्यादित नाही, तर जगातील सर्व परतंत्र देशांना स्वातंत्र्यासाठी मार्गदर्शक ठरणारा होता. मॅझिनीच्या मते, "राजकारण हे नीतीला धरून असावे. राजकारणातील प्रथम कर्तव्य स्वातंत्र्य संपादन होय. ज्या राष्ट्रात हे सत्यप्रतिपादन करण्याची बंदी झालेली असेल त्यांनी गुप्त मंडळे स्थापन करावीत. त्या गुप्तमंडळांचे कर्तव्य दुहेरी असावे. पहिले कर्तव्य म्हणजे मानसिक शिक्षण हे होय. या मानसिक शिक्षणाने गुप्त व उघड रीतीने स्वातंत्र्य, समता, राष्ट्रैक्य व लोकसत्ता या चार तत्वांचे मुख्यत: शिक्षण द्यावे. दुसरे कर्तव्य असे की, या चार तत्वांच्या विजयासाठी धर्मयुद्ध करण्याची तयारी करणे. हे युद्ध गनिमी काव्याने करावे. मानसिक शिक्षणाने युद्धास साध्य मिळेल व युद्धाने मानसिक शिक्षण वाढेल. अशा रीतीने स्वदेश परकीय सत्तेतून मुक्त झाला म्हणजे त्याचे वर्तन असे ठेवावे

की, त्या योगाने मानवजातीच्या विकासाला व प्रगतीला साध्य व्हावे. आपणांस सामर्थ्य येताच इतर गांजलेल्या राष्ट्रांना मुक्त करावे, व सर्व मनुष्यजातीचे स्वतंत्रतेने, समतेने व बंधुभावाने परमेश्वरी आज्ञेचे पालन करावे. हा मॅझिनीच्या राजकीय मतांचा व कार्यक्रमांचा मथितार्थ आहे. हा नकाशा पुढे ठेवून इटली स्वतंत्र झाली. [3]

मॅझिनीच्या या राष्ट्रवादी विचारांनी सावरकरांना भारतीय स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीच्या मार्गाबाबत दृढ आत्मविश्वास निर्माण झाला. त्यामुळे त्यांनी आपल्या राष्ट्रवादी विचारांना मॅझिनीच्या विचारांचा भक्कम आधार देऊन आपला "हिंदी राष्ट्रवाद" विकसीत केला.

इटालियन लोकांनी ऑस्टियाविरूद्ध सशस्त्र क्रांती करून इटली देश स्वतंत्र केला. त्याप्रमाणेच भारतीयांनी इंग्रजांविरूद्ध सशस्त्र क्रांती करून भारताचे स्वातंत्र्य मिळवावे असे सावरकरांना वाटत होते. म्हणून भारतीयांत स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीची चेतना निर्माण व्हावी यासाठी त्यांनी पन्नास वर्षापूर्वी भारतात इंग्रजांविरूद्ध प्रत्यक्ष घडलेल्या १८५७ च्या क्रांतीचे राष्ट्रवादी दृष्टिकोणातून वर्णन केले. त्यांच्या मते, १८५७ मध्ये स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी भारतीयांनी इंग्रजांविरूद्ध केलेली सशस्त्र क्रांती ही राष्ट्रीय स्वातंत्र्याचा महान लढा होय. या स्वातंत्र्य लढयात हिंदी सैनिक, संस्थानिक आणि हिंदु-मुस्लीम देशबांधव अशा सर्वांनीच स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी "जिंकू किंवा मरू" या उदात्त ध्येयाने इंग्रजांविरूद्ध स्वातंत्र्य लढा दिला. त्यामुळे ही क्रांती राष्ट्रीय स्वरूपाची होती. इंग्रज लोक आपल्या स्वधर्म व स्वराज्याची हेतुपुर्वक पायमल्ली करीत आहेत. असे लक्षात येताच देशातील हिंदु-मुस्लीमांनी परस्परातील परंपरागत वैर विसरून स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी

ऐक्याच्या, सहकार्याच्या व बंधुत्वाच्या भावनेने एकत्र येऊन इंग्रजांविरूद्ध संघटीत क्रांती घडवून आणली. त्यामुळे या राष्ट्रीय स्वातंत्र्य युध्दात हिंदु-मुस्लीम देशबांधवात ऐक्य होते. तेव्हा राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी देशातील हिंदु-मुस्लीम देशबांधवांनी स्वदेश ऐक्याच्या भावनेने १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दाप्रमाणेच पुन्हा इंग्रजांविरूद्ध संघटीत सशस्त्र क्रांती करावी आणि भारताचे स्वातंत्र्य मिळवावे, अशी "हिंदी राष्ट्रवादी" भूमिका सावरकरांनी मांडली.

## सावरकरांचा हिंदी राष्ट्रवाद :

सावरकरांचे अंतिम ध्येय भारताचे स्वातंत्र्य मिळविणे हे होते. या दृष्टीनेच त्यांनी आपल्या "हिंदी राष्ट्रवादाची" प्रागतीक अशी व्याख्या केली. त्यांच्या मते, राष्ट्र म्हणजे सर्वांच्या संमतीने एकजीव झालेले आणि एकाच शासन पध्दतीने शासीत असलेले लोक होत. हे लोक एका विशिष्ट प्रादेशिक विभागात राहातात. आधुनिक जगात राष्ट्र हाच सर्वात मोठा मनुष्य संघ आहे. त्यापेक्षा मोठया असणाऱ्या विश्वसंघाकडे जाण्याचा तो एक अपरिहार्य मार्ग आहे. [४]

सावरकरांनी भारताचे स्वातंत्र्य मिळविण्याच्या हेतूने आपल्या "हिंदी राष्ट्रवादाची"मांडणी केली. त्यामुळे त्यांच्या राष्ट्रवादाची पुढील उद्दिष्टये होती. भारताला संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य मिळविणे, स्वातंत्र्यासाठी सर्व भारतीयांना संघटीत होऊन इंग्रजांविरूद्ध सशस्त्र क्रांती करणे, देश स्वतंत्र होताच लोकांच्या व देशाच्या सर्वांगिण विकासासाठी देशात लोकसत्ता स्थापन करणे. देशातील सर्व लोकांना समान अधिकार देऊन स्वातंत्र्य,

समता, बंधुता व राष्ट्रैक्य या तत्वांची स्थापना करणे, लोकांत विश्वबंधुत्वाची व सहकार्याची भावना वृध्दिंगत करणे.

सावरकरांच्या मते, नि:शस्त्र संघर्षाच्या मार्गाने भारताला थोडे फार गुलामगिरीचे हक्क मिळतील, परंतु संपूर्ण स्वातंत्र्य मिळणार नाही. तेंव्हा भारतीयांनी गुलामगिरीच्या अनंत हक्कापेक्षा स्वतंत्रतेचा एकच हक्क मिळविण्यासाठी इंग्रजांविरूध्द संघटीत होऊन संघर्ष केला पाहिजे, तरच भारताला स्वातंत्र्य मिळेल. सशस्त्र संघर्ष गनिमीकावा पध्दतीने करावा. प्रबळ इंग्रज सत्तेचा पराभव करण्यासाठी गनिमीकावा पध्दतीच उपयुक्त आहे. स्वातंत्र्यदेवीकडे जाण्याचा व योग्य रीतीने आक्रमण करण्याचा गनिमीकावा हा एकच मार्ग आहे. गनिमीकावा अजिंक्य व अविनाशी आहे. म्हणून स्वातंत्र्ययुध्दाचा आरंभ गनिमीकाव्याने करावा. समर्थांच्या उपदेशात गनिमी युध्दावर भर ठेवलेला होता. छ. शिवाजी महाराजांपासून ते स्वातंत्र्यप्राप्तीच्या राजाराम महाराजांच्या अंतापर्यंत मराठेवीरांनी गनिमीकावा पध्दतीचा स्वीकार केला होता. तसेच इटलीनेही याच पध्दतीचा स्वीकार करून स्वातंत्र्य मिळविले. म्हणून भारतीयांनी या विचारातून प्रेरणा घेऊन राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी गनिमीकावा पध्दतीने युध्द करावे. [५]

१८५७ मध्ये स्वधर्म व स्वराज्य रक्षणाच्या स्वातंत्र्ययुध्दात भारतातील हिंदु-मुस्लीम देशबांधवांनी परस्परातील परंपरागत वैर विसरून ऐक्याच्या, सहकाऱ्याच्या, बंधुत्वांच्या भावनेने इंग्रजांविरूध्द "जिंकू किंवा मरू" या दृढ निर्धाराने सशस्त्र क्रांती केली, त्याप्रमाणेच पुन्हा त्या स्वातंत्र्ययुध्दाची प्रेरणा घेऊन हिंदु-मुस्लीम देशबांधवांनी स्वदेश स्वातंत्र्यासाठी ऐक्याच्या, सहकाऱ्याच्या, बंधुत्वाच्या भावनेने संघटीत होऊन इंग्रजांविरूध्द सशस्त्र क्रांती

करावी. हिंदु-मुस्लीम बांधवांनी ऐक्याच्या भावनेने संघटीत होऊन इंग्रजांविरुध्द सशस्त्र क्रांती केली तर भारताना निश्चितच स्वातंत्र्य मिळेल. म्हणून स्वदेश स्वातंत्र्यासाठी हिंदु-मुस्लीम देशबांधवांनी परस्परात ऐक्य घडवून आणावे. कारण ऐक्याशिवाय खरे राष्ट्र निर्माण होत नाही. खरी शक्तीमत्ता येत नाही. [६]

## धर्म आणि राजकारण :

सावरकरांच्या मते, धर्म आणि राजकारण हे परस्परांशी संलग्न होत. त्यांनी राजकारणाला धर्माचा आधार देऊन धर्म आणि राजकारण यातील परस्पर संबंध स्पष्ट केला. त्यांच्या मते, धर्म आणि राजकारण ही परस्पर विरोधी नसून ती एकाच मार्गाच्या दोन भिन्न भागांची नावे आहेत. राजकारण म्हणजे समाजाची, स्वदेशाची व स्वराष्ट्राची दास्यमुक्तता व संवर्धन होय, त्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे मनुष्यजातीवर आलेले भयंकर संकट निमूटपणे पाहण्याचे पाप करणे होय. सावरकरांचे या विषयीचे विचार मॅझिनीच्या विचारांवर आधारीत होते.

सावरकरांनी राजकारणाला नैतिकता प्राप्त करुन देण्यासाठी धर्म हा घटक महत्त्वाचा मानला. स्वधर्माचे रक्षण करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. तेव्हा देशातील सर्व हिंदु-मुस्लीम, शीख, ख्रिश्चन धर्मीयांनी स्वधर्म रक्षणासाठी प्रयत्न करावा. पण सावरकरांच्या मते, स्वधर्म रक्षण म्हणजे इतरांचा द्वेष करणे नव्हे.

दुसरी गोष्ट म्हणजे केवळ एकच धर्म राष्ट्राचा आधार नसतो. एकाच देशात राहाणारे सर्व लोक देशाचे घटक असतात. त्यामुळे भारत हे केवळ

हिंदुंचेच राष्ट्र नसून ते सर्व धर्मीयांचे राष्ट्र आहे, हे मत सावरकरांना या काळात मान्य होते. त्यामुळे त्यांना मुसलमानांच्या द्वेषावर आधारलेले राजकारण अमान्य होते.

तिसरी गोष्ट म्हणजे धर्म हे राजकारणात सत्ता मिळविण्याचे साधन म्हणून त्यांना मान्य नव्हते. कारण धर्माचा राजकारणासाठी वापर केला की हिंदु-मुस्लीम यांत दुही निर्माण होईल व राष्ट्र कमजोर बनेल.

सावरकरांच्या १९१० पर्यंतच्या विचारांचा अभ्यास केला असता असे दिसते की, या काळात ते हिंदी राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते होते. त्याचे राजकीय विचार सशस्त्र क्रांतीकारक आणि जहाल राष्ट्रवाद या जवळचे होते. या काळात त्यांनी मांडलेल्या हिंदी राष्ट्रवादाची काही वैशिष्टये खालील प्रमाणे सांगता येतील.

१) सर्व भारतीय लोकांच्यासाठी राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळविणे.
२) नैतिक दृष्टिकोणातून राजकारणाला धर्म मानणे.
३) राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार.
४) लोकशाही आणि पुरोगामी मूल्यांचा स्वीकार.
५) हिंदु-मुस्लीम ऐक्याचा स्वीकार.
६) संघराज्याऐवजी एकात्म राज्याचा पुरस्कार.

इत्यादी वैशिष्टयांचा त्यांनी हिंदी राष्ट्रवादात समावेश केला. त्यासाठी त्यांनी अनेक ग्रंथ पुस्तके लिहून प्रचार केला. १९१० साली सावरकरांना अटक झाली आणि त्यांना अंदमानाच्या तुरुंगात काळ्यापाण्यावर १९२१ पर्यंत

जीवन चालवावे लागले. या काळात सावरकरांच्या हिंदी राष्ट्रवादी विचारांत बदल झालेला दिसतो. या बदलाची कारणे काय होती हे अजून पुर्णपणे स्पष्ट झाले नाही. तरीपण सावरकरांना तुरुंगातील मुस्लीम कैद्यांची वागणूक आवडली नव्हती. त्यामुळे ते कडवे मुसलमान विरोधी बनले. असे कांही लोकांचे मत आहे.

१९२१ साली काळ्या पाण्यावरून परतल्यावर त्यांना असे वाटू लागले की, मुसलमान आक्रमक, मुजोर, फुटीर आणि अराष्ट्रीय आहेत. हिंदु-मुसलमान हे ऐकच राष्ट्र आहे. हे खरे नाही व म्हणून सुमारे हजारो वर्षे भारताच्या रणांगणांवर हिंदु-मुसलमानांच्यात झालेली रक्तमय युध्दे आधुनिक कालातील मुसलमानांची राजकीय सौदेबाजी आणि लोकसंख्येतील वाढते प्रमाण. म्हणून त्यांनी यापुढील काळात हिंदुत्ववादाचा स्वीकार केलेला दिसतो. १९२३ साली त्यांनी "हिंदुत्व" हा ग्रंथ प्रकाशित केला. त्यात त्यांच्या हिंदु राष्ट्रवादाची वैशिष्टये खालीलप्रमाणे होत -

१. सावरकरांच्या राष्ट्रवादाचे मूळ त्यांच्या स्वाभिमानात, म्हणजे "स्व" विषयक अभिमानात आहे. त्यांच्या "स्व" मध्ये हिंदु सामावत, पण भारतातील मुसलमानादिक अहिंदु सामावत नसत.

२. त्यांचा हिंदुत्ववाद हा मुख्यत: "हिंदु-राष्ट्रवाद" होता. भारत हा हिंदूंचाच देश आहे, हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व आहे असा त्यांचा सिध्दांत होता.

३. स्वत:ची वेगळी अस्मिता असणाऱ्या आणि अनेक सांस्कृतिक बंधनांनी निबध्द झालेल्या पुरेशा मोठया समाज समुहाला ते राष्ट्र समजत. त्यांची राष्ट्रकल्पना प्रदेश-विशिष्ट किंवा राज्य-विशिष्ट असण्या-

पेक्षा समाज समुह-विशिष्ट आणि संस्कृती-विशिष्ट होती.

४. अहिंदुंना ते राष्ट्रांतर्गत मानीत नव्हते. तर राज्यांतर्गत मानीत होते. अहिंदुनां नागरिकत्वाचे समान अधिकार देण्यास त्यांचा विरोध नव्हता.

५. सावरकरांचा हिंदुत्ववाद धार्मिक किंवा पारधार्मिक नव्हता. प्रथम हिंदु समाज, मग हिंदु धर्म अशी ते मांडणी करीत.

६. भारत ज्याची पितृभू आणि पुण्यभू असेल तो हिंदु अशी त्यांची हिंदुत्वाची व्याख्या होती.

अशा प्रकारे सावरकरांनी "हिंदु" राष्ट्रवादाची मांडणी करुन या पुढील काळात ते आजन्म हिंदु राष्ट्रवादाचा पुरस्कार करीत राहीले.

सावरकरांच्या दीर्घ अशा राजकीय जीवनातील राजकीय विचारांचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, सावरकर हे पहिल्या (१९१० पर्यंत-च्या) अभिनव पर्व काळात "हिंदी राष्ट्रवादी" विचारांचे पुरस्कर्ते होते. परंतु १९२१ नंतर त्यांच्या राजकीय विचारांत बदल होऊन त्यांनी हिंदु-राष्ट्रवादा-चा पुरस्कार केलेला दिसतो.

सावरकरांच्या हिंदी व हिंदु राष्ट्रवादातील फरक पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

१. सावरकरांनी हिंदी राष्ट्रवादात जात, धर्म, पंथ, असा कोणताही भेद न मानता सर्व भारतीयांच्या संघटनावर व ऐक्यावर भर दिला. परंतु नंतर त्यांनी मुसलमानांना नमवून हिंदुराष्ट्रवादाची मांडणी केली.

२. सावरकरांचा "हिंदी राष्ट्रवाद" प्रदेशावर अधिष्टीत आहे तर "हिंदुत्ववाद" धर्मावर अधिष्ठित आहे.

३. हिंदी राष्ट्रवादात राजकारणाला धर्माच्या नैतिकतेची जोड दिली परंतु हिंदु राष्ट्रवादास त्यांनी राजकारणात धर्माला साधन म्हणून वापरले आहे.

४. हिंदी राष्ट्रवादास सावरकरांनी अहिंदूना राष्ट्रांतर्गत मानले. परंतु हिंदु राष्ट्रवादात त्यांना त्यांनी राज्यांतर्गत मानले आहे.

सावरकरांनी हिंदी राष्ट्रवादाच्या काळात हिंदु-मुस्लीम ऐक्याचा पुरस्कार केला आणि स्वातंत्र समता व लोकशाही मुल्यांना महत्त्वाचे स्थान दिले. पणहिंदुत्व आणि अहिंदुना राजकीय समता नाकारली त्यामुळे ते त्यांच्या लोकशाही तत्वाला बाधा पोहचते. हिंदी राष्ट्रवादी सावरकर स्वातंत्र्यासारख्या मूल्यावर श्रध्दा ठेवून बलीदान करु इच्छित होते. तर हिंदू राष्ट्रवादी सावरकरांचा सर्व आग्रह हिंदु राष्ट्राला बळकट करण्याचा आहे. येथे सावरकर नीतिमत्तेपेक्षा सामर्थ्याला जास्त महत्व देत होते.

.......

## प्रकरण पाचवे

## संदर्भ ग्रंथ


१. सावरकर वि.दा. - समग्र सावरकर वाङ्मय, खंड १, आत्मचरित्र, वीर सावरकर प्रकाशन, मुंबई, १९९३, पृ.क्र. २७.

२. अंदूरकर व्यं.गो. - शत्रूच्या गोटात सावरकर, सुरस ग्रंथमाला, सोलापूर, १९७०, पृ.क्र. ३३.

३. सावरकर वि.दा. - जोसेफ मॅझिनी, आत्मचरित्र व राजकारण, मनोरमा प्रकाशन, मुंबई, १९९२, पृ.क्र.४१.

४. उक्त, - पृ.क्र. ७९.

५. उक्त, - पृ.क्र. ८८.

६. उक्त, - पृ.क्र. ८३.


......